# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे
# वार्षिक अहवाल 2020-21

महाराष्ट्रीय मंडळाचे संस्थापक कै. शिवरामपंत दामले, मंडळाचे माजी सरकार्यवाह कै. रमेश दामलेसर आणि आमचे स्फूर्तीस्थान कै. धनंजय दामले यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2020-21 चा वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

शै.वर्ष 2020-21 हे महाविद्यालयाचे ४४ वे वर्ष आहे. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.पी.एड्., एम.पी.एड्.,एम.फिल.(शारीरिक शिक्षण)(सुटीतील) व पीएच.डी.(शारीरिक शिक्षण) हे अभ्यासक्रम राबविले जातात. महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

- **ठळक वैशिष्ट्ये/विशेष कामगिरी**

1) फ़ॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये डॉ. शरद आहेर यांचा सहभाग (दि.३० मे ते ३ जून २०२०)
2) दि. २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन ऑनलाईन पध्दतीने संपन्न
3) कोव्हिड १९ लॉकडाऊनच्या काळात बीपीएड/एमपीएड विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाईन तासिका व शालेय पाठ घेण्याची व्यवस्था.
4) गतिमान शारीरिक शिक्षण – ऑनलाईन षण्मासिक प्रकाशित (२५ जुलै २०२०)
5) कोव्हिड १९ लॉकडाऊनच्या काळात बीपीएड/एमपीएड प्रवेश २०२०–२१ सीईटी मैदानपरीक्षेचे महाविद्यालयात यशस्वी आयोजन (दि. ३१/१० ते ९/१०/२०२०)
6) मे २०२० बीपीएड् व एमपीएड्.निकालामध्ये विद्यार्थ्यांचे १००% यश, एम.फिल –३ तर पीएच डी –६ विद्यार्थी उत्तीर्ण
7) सेट – १२ विद्यार्थी व नेट – ०६ विद्यार्थी उत्तीर्ण
8) महाविद्यालयासाठी नियमावलीची (संहिता) निर्मिती (डॉ.राजे, डॉ. देशपांडे व डॉ. बोडके) (सप्टेंबर २०२०)
9) महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण ( दि. ३ डिसेंबर २०२०)
10) डॉ.श्रध्दा नाईक महाविद्यालयामध्ये पुन:श्च रूजू (दि.४ डिसेंबर २०२०)
11) प्राध्यापकांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंत प्रोग्रॅमचे महाविद्यालयात आयोजन (दि.५ जाने.२०२१ पासून)
12) कॅस अंतर्गत डॉ.पोटे व डॉ. आहेर यांची प्राध्यापक पदावर पदोन्नती (दि.१० जाने २०२१)
13) महाविद्यालयाचे प्रत्यक्ष कामकाज दि.११ जानेवारी २०२१ पासून सुरू.
14) डॉ.श्रध्दा नाईक, डॉ. योगेश बोडके व प्रा. शिरिष मोरे – एलएनयूपीई ग्वाल्हेर येथील रिफ़ेशर कोर्स पूर्ण केला ( दि.१२ ते २५ ज़ानेवारी २०२१)
15) प्रा.कुमार उपाध्याय –सा.फु.पुणे विद्यापीठाचा फॅकल्टी इंडक्शन प्रोग्राम पूर्ण (दि.५–२ ते ३–३–२०२१)
16) दोन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम्सचे आयोजन (दि. ५ ते ८ जानेवारी २०२१ व दि.१ ते ४ फेब्रु.२०२१)
17) माजी विद्यार्थी मेळावा संपन्न (दि.३१ जानेवारी २०२१)
18) डॉ.उमेश पनेरू,डॉ.सुरेखा दप्तरे आणि डॉ. पांडुरंग लोहोटे या माजी विद्यार्थ्यांना सहयोगी पीएच.डी मार्गदर्शक म्हणून मान्यता
19) मराठी गौरव दिन – (दि. २७ फेब्रुवारी २०२१)
20) बीपीएड (प्रथमवर्ष) ऑनलाईन पालकसभा – दि.६ मार्च २०२१
21) स्पीच कल्चर कार्यशाळा – दि.२० मार्च २०२१ (डॉ.नमिता जोशी स्पीच थेरपिस्ट आणि टीम केईएम हॉस्पिटल,पुणे)
22) मैदानी खेळांत झेप घेण्यासाठी लीप आंतरराष्ट्रीय परिषदेचे ऑनलाईन आयोजन दि.२४ व २५ मार्च २०२१
23) द स्पेक्ट्रम ऑफ टिचिंग स्टाईल – आंतरराष्ट्रीय कार्यशाळा (दि.१–०४–२०२१)
24) संस्थेचे सरकार्यवाह श्री धनंजय दामले यांचे दु:खद निधन (दि.२–०४–२०२१)
25) प्रा. शिरिष मोरे – पीएच.डी. प्राप्त (दि.६–०४–२०२१)

26) ऑनलाईन परीक्षा आयोजन

27) कोव्हिड १९ लॉक डाऊन काळात फेसबुक वर शारीरिक शिक्षण विषयक व्हेबिनारचे आयोजन

28) कोव्हिड १९ लॉकडाऊनमुळे शासन आदेशान्वये दि. १४ मार्च ते ३० जून २०२० व १० एप्रिल २०२१ ते शासनाचे आदेश प्राप्त होईपर्यंत या कालावधीत महाविद्यालयातील प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य बंद व ऑनलाईन लेक्चर्सची व्यवस्था

**गतवर्षीय परीक्षा फल : सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|
| बीपीएड (मे २०१८) | १००% |
| एमपीएड् (मे २०१८) | १००% |

| अभ्यासक्रम | 2020-21 मधील उत्तीर्ण | 2020-21 पर्यंत उत्तीर्ण |
|---|---|---|
| **एम.फिल (शा.शि.)** | 03 | 100 |
| **पीअेच.डी.** | 06 | 38 |

| | |
|---|---|
| **सेट परीक्षा – नोव्हें२०१९** | ०५ विद्यार्थी उत्तीर्ण |
| **नेट परीक्षा –२०१९** | ०४ विद्यार्थी उत्तीर्ण |
| **सेट परीक्षा – डिसेंबर २०२०** | ०७ विद्यार्थी उत्तीर्ण |
| **नेट परीक्षा डिसेंबर २०२०** | ०२ विद्यार्थी उत्तीर्ण |

- **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम (परीक्षा मे २०२०)**
  **बीपीएड –** कु.रूची वेरेकर
  **एमपीएड –** सौ. शहनाझ खान
- **एम.फिल –**श्री प्रनोज टी.व्ही.(मार्गदर्शक – डॉ.महेश देशपांडे)
- श्री. हिमांशु तिवारी (मार्गदर्शक – डॉ. श्रध्दा नाईक)
- श्री. संदीप वानखडे (मार्गदर्शक – डॉ.सोपान कांगणे)

- **पीएच.डी.–**श्री बिबवे उमेश (मार्गदर्शक–डॉ.सॅव्हियो व्हेगस)
  श्री अरविंद चव्हाण (मार्गदर्शक–डॉ. आशा बेंगळे)
  श्री मोहित शिंदे (मार्गदर्शक–डॉ. श्रध्दा नाईक)
  कु. निशिगंधा पाटील (मार्गदर्शक–डॉ. श्रध्दा नाईक)
  श्री रामहरी नागटिळक (मार्गदर्शक–डॉ.शरद आहेर )
  श्री सुनिल कुटे (मार्गदर्शक –प्राचार्य, डॉ.सोपान कांगणे)

➢ **प्रवेश**

- **बी.पी.एड्.** या वर्षावधीत महाराष्ट्र शासनाच्या सीईटी द्वारे १०३ विद्यार्थ्यांनी बी.पी.एड्. अभ्यासक्रम (प्रथमवर्ष) साठी प्रवेश घेतला आहे. बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत. बी.पी.एड्. अभ्यासक्रम (द्वितीयवर्ष) साठी ९९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.
- **एम.पी एड.** (प्रथमसत्र) यावर्षी सीईटी द्वारे एमपीएड अभ्यासक्रमास ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीयवर्ष मध्ये ३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
- **सत्रारंभ –**

| | |
|---|---|
| बीपीएड्.(द्वितीयवर्ष) | दि. १ जून २०२० |
| एमपीएड्.(द्वितीयवर्ष) | दि. १ जून २०२० |
| बीपीएड्.(प्रथम वर्ष) | दि. १ मार्च २०२१ |

| | |
|---|---|
| एमपीएड्.(प्रथम वर्ष) | दि. १ मार्च २०२१ |

- **एम. फिल्.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)**
  एम.फिल.(सुटीतील)अभ्यासक्रम प्रवेशप्रक्रिया सा.फु.पुणे विद्यापीठाकडे आहे. या वर्षावधीत एम.फिल.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)प्रवेश नाहीत. .
- **पीएच.डी.**
  शै. वर्ष २०२०–२१ मध्ये पीएच.डी साठी नवीन प्रवेश नाहीत.

- **पंच कार्य**
  आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. रोख पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात. शिरिष मोरे आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा व पंचकार्य विभाग सांभाळतात.

- **महाविद्यालय विकास समिती**
  विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालय विकास समिती अस्तित्त्वात असून या वर्षावधीत समितीची सभा आयोजित करण्यात आल्या. (दि.३०–०३–२०२०)

- **अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्ष (आयक्यूएसी)**

. महाविद्यालयामध्ये गुणवत्ता सुधार व नियमनाबाबत करावयाच्या वाटचालीसाठी अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्ष अस्तित्त्वात असून वर्षावधीत या समितीच्या तीन सभा आयोजित करण्यात आल्या.ज्यामध्ये गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने ध्येय धोरणे ठरवून कार्यवाही करण्यात आली.

- **शैक्षणिक प्रशासकीय लेखापरीक्षण**
  महाविद्यालय नॅक मूल्यांकनाच्या तृतीय फेरीची तयारी करीत आहे. त्यादृष्टीने पूर्वतयारी म्हणून दि. ३ डिसेंबर २०२०२ रोजी डॉ. भारत कानगुडे, डॉ.पराग शहा व डॉ. उमेश बिबवे या बहि:स्थ समितीसदस्यांद्वारे महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यांत आले.
- **गतिमान शारीरिक शिक्षण** – शारीरिक शिक्षण क्रीडाक्षेत्रातील साहित्यनिर्मितीसाठी महाविद्यालयाने पुढाकार घेऊन जून २०२०२ पासून गतिमान शारीरिक शिक्षण हे ऑनलाईन षण्मासिक प्रकाशित करण्यास प्रारंभ केला आहे.

## आयोजन

- **कोव्हिड १९ लॉकडाऊनमुळे प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांच्या उपस्थितीत शासननियमांचे पालन करून आयोजन करण्यांत आले.

- **LEAP आंतरराष्ट्रीय परिषद**
  दि. २४ व २५ मार्च २०२१ रोजी महाविद्यालय आणि असोसिएशन ऑफ फिजिकल एज्युकेशन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने **LEAP** आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली. कोव्हिड १९ ची वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन ऑनलाईन स्वरूपात या परिषदेचे आयोजन करण्यात आले. मैदानी खेळात झेप घेण्यासाठी क्रीडामार्गदर्शक, खेळाडूंना मार्गदर्शन करणे हा आंतरराष्ट्रीय परिषदेचा हेतू होता. प्रत्येक दिवशी दोन प्रमाणे एकूण चार सत्रांमध्ये हे परिषद संपन्न झाली. या ऑनलाईन परिषदेचे उदघाटन स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे प्रमुख संदीप प्रधान आणि सरकार्यवाह धनंजय दामले यांचे हस्ते झाले.

दि.२४ मार्च २०२१ रोजी – नॅन्सी क्लार्क,डॉ.अतुल गायकवाड, तर दुस–या दिवशी डॉ.डोनवन पिलाई, सुनंदन लेले, डॉ.जानकी देवळे, डॉ.अजित मापारी व डॉ.तन्मयी जोशी इ.नामवंत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे ७० संशोधन प्रबंध देखील सादर करण्यात आले

या परिषदेमध्ये, शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, क्रीडामार्गदर्शक, प्राध्यापक, शिक्षक,विद्यार्थी व त्यांच्या शारीरिक सुदृढतेविषयी जागरूक पालकवर्ग असे एकूण ३२५ सहभागींचा उत्तम प्रतिसाद लाभला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान कांगणे या कार्यशाळेचे संचालक होते. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. योगेश बोडके यांनी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे नियोजन केले.

- **Workshop on Speech Culture**

दि.२० मार्च २०२१ रोजी डॉ.नमिता जोशी स्पीच थेरपिस्ट आणि टीम केईएम हॉस्पिटल,पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पीच कल्चर विषयावर प्राध्यापकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. शिक्षकांनी आवाजाच्या बाबतीत घ्यावयाच्या खबरदारीसंबंधी उत्तम कार्यशाळेत करण्यात आले. यावेळी आवाजाशी संबंधित वैद्यकीय चाचण्या घेण्यात आल्या.

- **International Workshop on the Spectrum of Teaching Style**

दि.१ एप्रिल २०२१ रोजी महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी **the Spectrum of Teaching Style** या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण व वैचारिक मंथन करणा–या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन ऑनलाईन स्वरूपात करण्यात आले. प्रो. सारा वर्डसवर्थ या आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ञांनी कार्यशाळेस मार्गदर्शन केले. डॉ. श्रध्दा नाईक या कार्यशाळेच्या समन्वयक होत्या.

- **मराठी भाषा गौरव दिन**

२७ फेब्रुवारी हा ज्ञानपीठ पारितोषिक विजेते विख्यात साहित्यिक, नाटकखार व कविश्रेष्ठ कै. वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन शासनाच्या आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आदेशानुसार मराठी गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने महाविद्यालयात प्रा. दिलीप जोशी, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, वाशिम यांचे मातृभाषेद्वारे मनुष्य निर्माण या विषयावर ऑनलाईन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन निबंधस्पर्धा घेण्यात आली.

- **विस्तार विभागा अंतर्गत शॉर्ट टर्म कोर्सेस**

विद्यार्थ्यांना शा.शि. व फिटनेस क्षेत्रातील बदलत्या ट्रेंडविषयी अत्याधुनिक शिक्षण मिळण्यासाठी महाविद्यालयाच्या विस्तारविभागा अंतर्गत बीपीएडच्या विद्यार्थ्यांसाठी खालील ॲडऑन कोर्सेस घेण्यात आले.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १ | योग इन्स्ट्रक्टर | पल्लवी कव्हाणे, निलेश यादव |
| २ | स्पोर्टस न्युट्रिशन | असोसिएशन ऑफ स्पोर्टस न्युट्रिशन ॲन्ड फिटनेस सायन्सेस,मुंबई |

- **प्रबोधनवर्ग/प्रशिक्षणवर्ग**

यंदा प्राध्यापकांसाठी महाविद्यालयामध्ये आय.क्यू.ए.सी च्या वतीने डॉ. दत्तात्रेय तापकीर यांच्या नेतृत्तवाखाली दि.३ मे २०२१ रोजी सूक्ष्म अध्यापन या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यांत आले व्याख्यान व प्रात्यक्षिके असे या कार्यशाळेचे स्वरूप होते.

- **छात्रसेवा उपक्रम**

  बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी छात्रसेवा (इंटर्नशीप) कार्यक्रम विद्यार्थ्यांना थेट शाळेत शिकविण्याचा अनुभव मिळण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यांत येतो. लॉकडाऊन मुळे विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील शाळांमध्ये, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन छात्रसेवा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.

- **आंतरराष्ट्रीय योग दिन**

  कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशान्वये महाविद्यालये बंद असल्यामुळे दि २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योगतज्ज्ञ डॉ. पल्लवी कव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योगदिन ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाला. यामध्ये योगासने, सूर्यनमस्कार व प्राणायाम यांचा समावेश होता. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व आमचे बीपीएड/एमपीएडचे विद्यार्थी शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले.

- **अंतर्गत तक्रार निवारण समिती**

  महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती अस्तित्त्वात असून ही समिती विद्यार्थ्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घेऊन तक्रारींचे निवारण करण्याचे कार्य करते.

- **राष्ट्रीय चर्चासत्रे कार्यशाळा, प्रमाणपत्र कोर्स इ. सहभाग**

  कोव्हिड १९ लॉकडाऊन कालावधीमध्ये दि. २ जून २०२० रोजी शारीरिक शिक्षण विषयावर फेसबुक लाईव्ह व्हेबिनार आयोजित करण्यांत आला यामध्ये शारीरिक शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ शालेय शिक्षक, शारीरिक शिक्षण संचालक यांनी सहभाग घेतला

  त्याचप्रमाणे दि. ४ ते ८ जून २०२० या कालावधीत ई.एल.एम.एस.स्पोर्टस फाऊंडेशनने आयोजित केलेल्या शारीरिक साक्षरता (Physical Literacy) ऑनलाईन सेशनमध्ये प्राचार्य डॉ. सोपान कांगणे यांचेसह सर्व प्राध्यापकांचा सहभाग होता. या चर्चासत्रामध्ये टेबलटेनिसचे विख्यात मार्गदर्शक मा. श्री पुल्लेला गोपीचंद यांचे बीजभाषण झाले.

  कोव्हिड१९ लॉकडाऊनच्या कालावधीत प्राचार्यांसह सर्व प्राध्यापकांनी अनेक व्हेबिनार्स, वर्कशॉप्स, चर्चासत्रे यामध्ये सहभागी होऊन संशोधन पेपर्स सादर व प्रकाशित केले.

- **प्राध्यापकांची कामगिरी**
  - प्राचार्य,डॉ. कांगणे – सा.फु.पुणे परीक्षा गैरप्रकार चौकशी समिती सदस्य .
  - डॉ. बालाजी पोटे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण योजनेचे समन्वयक असून महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक आहेत.
  - डॉ.शरद आहेर–पदव्युत्तर विभाग प्रमुख म्हणून काम पहातात तसेच महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्षाचे समन्वयक आहेत
  - डॉ.आहेर व डॉ.बोडके –दरवर्षी पुणे जिल्ह्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी अडथळ्यांच्या शर्यतीचे यशस्वी आयोजन करतात.
  - डॉ. उज्वला राजे शालेय पाठ विभागाचे व प्लेसमेंट सेलचे काम पहातात. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समिती अध्यक्ष आहेत.
  - डॉ. श्रद्धा नाईक –सिंबॉयोसिस आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आय.क्यू.ए.सी.सद्स्य असून हेल्थ ॲन्ड बायोलॉजिकल सायन्स शाखेअंतर्गत न्युट्रिशन डायटेटिक ॲन्ड स्पोर्टस सायन्सच्या पीएच.डी. प्रवेश समितीच्या सदस्य आहेत.
  - डॉ. श्रीकांत महाडिक –विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि स्पोर्टस साहित्य विभाग सांभाळतात.ॲथलेटिक मीटचे समन्वयक .

- डॉ. एम.एन. देशपांडे संशोधन विभागाचे व विस्तार विभागाचे समन्वयक आहेत.
- डॉ. योगेश बोडके – ह्युमन परफॉरमन्स लॅबचे समन्वयक आहेत.
- डॉ. अमित प्रभू – महाविद्यालयाचा माहिती तंत्रज्ञान विभाग सांभाळत्तात.
- प्रा. शिरिष मोरे आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धाविभाग व पंचकार्य विभाग सांभाळतात. आगाशियन्स या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव आहेत. शासकीय स्तरावर शारीरिक शिक्षण या विषयास न्याय मिळण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात.नुकतीच त्यांनी सावित्रबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.
- प्रा. कुमार उपाध्याय – पुणे ते हंपी – सायकल सफारी – दि.२२ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२१ या कालवधीत यशस्वीपणे पार पाडली.प्राचीन भारतीय स्थापत्यकला, संस्कृती व भौगोलिक विविधतेचा अभ्यास करणे या हेतूने सायकल सफारी आयोजित करण्यात आली. सायकल सफारीद्वारे त्यांनी व्यायाम, शारीरिक तंदुरूस्तीचे महत्त्व आणि प्रदूषण मुक्तीसाठी जनजागृती करून फिट इडिया ही संकल्पना जनमानसापर्यत पोहोचविली.
- प्रा.सुमित तांबे – महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग सांभाळतात तसेच आंतरकुल स्पर्धा कार्यक्रमाचे संयोजन करतात

आमचे प्राध्यापक नेहमीच नियमित शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त अभिनव प्रयोग व संशोधन करतात. शारीरिक शिक्षणक्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा इ.मध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. आरोग्य, व्यायाम व शारीरिक तंदुरुस्ती विषयक व्याख्यानांद्वारे, पुस्तकलेखन व अभिनव विधायक उपक्रमाद्वारे समाज प्रबोधन करतात.

आज मितीस महाविद्यालयात प्राचार्यांसह दहा प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत. १४ प्राध्यापकांना पीअेच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त आहे.

कोव्हिड लॉकडाऊनच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालयाने नियमितपणे ऑमलाईन व्याख्याने, व्हेबिनार्स, कार्यशाळा आयोजित केले या उपक्रमास विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

- **कॅंपस प्लेसमेंट**

  विद्यार्थ्यांना चांगल्या रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयातील रोजगारकक्षाद्वारे कॅंपस इंटरव्ह्यू आयोजित केले जातात. विविध नामांकित शाळा,महाविद्यालये, जिम व कंपन्यामध्ये आमच्या बीपीएड्. व एम.पी.एड् च्या विद्यार्थ्यांना नोक–या मिळतात. वर्षभर विद्यार्थ्याना नोकरी संदर्भात मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येते.डॉ.उज्वला राजे प्लेसमेंट विभागाच्या समन्वयक आहेत.

- **परीक्षा आयोजन**

  कोव्हिड १९ लॉकडाऊनच्या कालावधीत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.पी.एड.व एम.पी.एड्.च्या परीक्षा संचालक डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वाच्या सहकार्याने विहित मुदतीत पूर्ण झाले.

- **ग्रंथालय**

  या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयासाठी Inflibnet चे सभासदत्त्व घेण्यात आले. त्यामुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना online resources उपलब्ध होत आहेत. या सॉफ्टवेअर वापराच्या मार्गदर्शनासाठे दि. २० मे २०२१ रोजी विद्यार्थ्यांसाठी व दि.२२ मे २०२१ रोजी प्राध्यापकांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यांत आले. तसेच एकूण रू.53,998/- चे संदर्भग्रंथ,पुस्तके,नियतकालिके इ. खरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 08 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके 11875, शीर्षके 10619 क्रमिक पुस्तके 455, संदर्भ ग्रंथ 4708,विश्वकोश 75, सीडी रॉम्स व व्ही.सी.डी 98 इ. उपलब्ध आहेत.

- **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने**

  कोरोना/कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशानुसार महाविद्यालय बंद असल्यामुळे, या लॉकडाऊनच्या काळात महाविद्यालयातील गुरूपौर्णिमा, प्रेरणादिन,गोपालकाला, रक्षाबंधन हे सांस्कृतिक आणि योगदिन, क्रीडादिन हे राष्ट्रीय कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आले. मकरसंक्रात, सांस्कृतिक व स्वातंत्र्यदिन प्रजासत्तकदिन अशा राष्ट्रीय कार्यक्रमांबरोबरच देशभक्तिपर गीते, मराठीगौरव दिन,हिंदी दिन, महिला दिन, संविधान दिन, राष्ट्रीय सण व ऑनलाईन योगदिन या कार्यक्रमांचा समावेश होता.

  वर्षभरात आयोजित करण्यात आलेली विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने खालीलप्रमाणे

| अ.क्र. | व्याख्यात्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| | **ऑनलाईन व्याख्याने** | |
| १ | प्रा.सुनिता कुलकर्णी | गुरूपौर्णिमा (दि.५ जुलै २०२०) |
| २ | डॉ. संजीव सोनवणे | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण |
| २ | डॉ. स्वाती गाडगीळ | रक्षाबंधन (दि.३ ऑगस्ट २०२०) |
| ३ | डॉ. महेश खेतमाळीस | गोपाळकाला (दि.१२ ऑगस्ट २०२०) |
| ४ | डॉ. दिनेश कराड | क्रीडादिन (दि.२९ ऑगस्ट २०२०) |
| ५ | श्री दिलीप जोशी | मातृभाषेतून मनुष्य निर्माण (२५ जानेवारी २०२१) |
| ६ | अजित महादेव जोशी | व्हॉलीबॉल मार्गदर्शन |

- **निवृत्ती,नियुक्ती,पदोन्नती व धारणाधिकार**

  डॉ. श्रध्दा नाईक यांची एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालकपदावर नियुक्ती झाली होती. ऑक्टोबर २०१९ पासून पाच वर्षांसाठी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकपदाचा धारणाधिकार राखून ठेवून त्यांनी ही नियुक्ती स्वीकारली. सदर पदाचा राजीनामा देऊन त्या दि. ४ डिसेंबर २०२० पासून पुन्हा महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापकपदावर रूजू झाल्या.

  या वर्षावधीमध्ये सेवांतर्गत पदोन्नती योजने अंतर्गत(CAS) खालील प्राध्यापक पदोन्नतीस पात्र ठरले.
  प्राध्यापक – डॉ. बालाजी पोटे, डॉ. शरद आहेर, डॉ. अमित प्रभू
  सहयोगी प्राध्यापक – डॉ. उज्वला राजे,डॉ.श्रीकांत महाडिक, व डॉ.महेश देशपांडे
  सहाय्यक प्राध्यापक – डॉ.श्रध्दा नाईक, डॉ.योगेश बोडके, डॉ.शिरिष मोरे

  महाविद्यालयाच्या सेवेत प्रदीर्घ काळ कार्यरत असलेले श्री खवले अशोक बाळू नियत वयोमानानुसार, दि. ३१ मे २०२१ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

- **दु:खद निधन**

  महाराष्ट्रीय मंडळाचे सरकार्यवाह आणि आमचे स्फूर्तिस्थान, मा. श्री धनंजय दामले यांचे दि.२ एप्रिल २०२१ रोजी अकस्मात दु:खद निधन झाले.

  महाविद्यालयाच्या प्रारंभापासून सेवेत असलेले सेवानिवृत्त सेवक, श्री विजय ओक यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले. ईश्वर मुक्तात्म्यांस चिरशांति देवो.

- **इमारतीचे विस्तारीकरण**

  महाविद्यालयाच्या इमारतीचे एका मजल्याचे ६००० स्क्वेअर मी.चे बांधकाम पूर्ण झाले असून यामध्ये पाच वर्गखोल्यांचा समावेश आहे.संस्थेचे खंबीर पाठबळ आणि आमचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्यामुळे महाविद्यालय प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

**(डॉ. सोपान एकनाथ कांगणे)**
**प्राचार्य**
**चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय**
**गुलटेकडी,पुणे ३७**

**दि.२८/०५/२०२१**